"दैनिक सकाळ"
दि:- 03/04/2025.

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

MAHARASHTRA

## पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीची सूचना

मे. बळीराजा साखर कारखाना लि., कानडखेड, ता. पूर्णा, जि. परभणी या उद्योगाचा प्रस्तावित उस गाळप क्षमता विस्तार ३५०० टन प्रतिदिन ते १०००० टन प्रतिदिन तसेच सहविजनिर्मिती १५ मेगावॅट ते ४० मेगावॅट प्रकल्प उभारणीसाठी सर्व्हे नं. १४८, १४९, १५१, १५२, १५८, १६४, १६५ व १६६, कानडखेड, ता. पूर्णा, जि. परभणी येथे प्रस्तावित केला असून या नियोजित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचा अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेला आहे व यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या EIA Notification No. S.O. १५३३ दिनांक १४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचनान्वये सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टीका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर जनसुनावणीचे आयोजन करण्यात येत आहे.

**सुनावणीचे ठिकाण** :- मे. बळीराजा साखर कारखाना लि., कानडखेड, ता. पूर्णा जि. परभणी. **(प्रकल्पाचे स्थळ)**.
**सुनावणीची तारीख** :- ७/०५/२०२५
**सुनावणीची वेळ** :- सकाळी १०:३० वाजता.

सदर प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे किंवा सदर प्रकल्पामुळे अन्यप्रकारे प्रभावीत होणारे रहिवासी यांना सदर प्रकल्पासंबंधी सूचना, टिका, टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरूपात नोंदविता येतील. सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरूपात सूचना ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसापर्यंत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात.

**उप-प्रादेशिक कार्यालय,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
**देवकृपा इमारत, पहिला मजला, रंगनाथ महाराज नगर, नांदखेडा रोड,**
**परभणी ४३१४०१. मेल - sroparbhani@mpcb.gov.in**

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले दस्ताऐवज खालील कार्यालयांमध्ये व मंडळाच्या mpcb.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, संबंधीत व्यक्ती या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.
२. जिल्हा परिषद कार्यालय, परभणी.
३. जिल्हा उद्योग केंद्र, परभणी.
४. उपविभागीय कार्यालय, गंगाखेड, ता. गंगाखेड, जि. परभणी.
५. तहसिल कार्यालय पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी.
६. नगर परीषद कार्यालय, पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी.
७. ग्रामपंचायत कार्यालय, कानडखेड, ता. पूर्णा, जि. परभणी.
८. उप प्रादेशिक कार्यालय, म. प्र. नि. मंडळ, देवकृपा इमारत, पहिला मजला, रंगनाथ महाराजनगर, नांदखेडा रोड, परभणी-४३१४०१.
९. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, भूखंड क्र. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, दैनिक लोकपत्रच्या मागे, सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल शेजारी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर.
१०. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा मजला, सायन माटूंगा स्कीम रोड नं. ८, शिव (पूर्व), मुंबई-४०००२२.
११. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

स्वाक्षरीत/-
**(एस. एम. कुरमुडे)**
**उप-प्रादेशिक अधिकारी**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी.**